POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२५ ● मुंबई, मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# 26 लाख अपात्र लाडक्या बहिणींची जिल्हास्तरीय छाननी सुरु, आता कारवाई होणार; अदिती तटकरेंची माहिती

**■मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यातील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या 26 लाख महिला या अपात्र ठरल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या अपात्र लाभार्थ्यांची आता जिल्हास्तरीय सुक्ष्म छाननी सुरू असल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी दिली. या छाननीतून अपात्र ठरलेल्या महिलांवर योग्य ती कारवाई होईल असंही त्या म्हणाल्या.

**काय म्हटलंय अदिती तटकरेंनी?**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थींपैकी सुमारे 26 लक्ष लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र दिसून येत नसल्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने प्राथमिक माहिती उपलब्ध करुन दिली होती. सदर सुमारे 26 लक्ष लाभार्थी राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील आहेत.

त्यानुसार महिला व बालविकास विभागाने सदर लाभार्थ्यांची प्राथमिक माहिती संबंधित जिल्हा यंत्रणेला छाननीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार हे लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र ठरतात किंवा नाही याबाबतची सुक्ष्म छाननी क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे. छाननीअंती या लाभार्थींची पात्रता/अपात्रता स्पष्ट होणार आहे.




## पुणे जिल्ह्यात सर्वाधिक बोगस लाभार्थी

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ही फसवणूक झाल्याचे दिसून आले आहे. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक 2,04,000 बोगस लाभार्थी आढळले. ठाण्यात 1,25,300, अहिल्यानगरमध्ये 1,25,756, नाशिकमध्ये 1,86,800, छत्रपती संभाजीनगरमध्ये 1,04,700, कोल्हापूरमध्ये 1,01,400, मुंबई उपनगरात 1,13,000, नागपुरात 95,500, बीडमध्ये 71,000, लातूरमध्ये 69,000, सोलापूरमध्ये 1,04,000, साताऱ्यात 86,000, सांगलीत 90,000, पालघरमध्ये 72,000, नांदेडमध्ये 92,000, जालन्यात 73,000, धुळ्यात 75,000 तर अमरावतीत 61,000 बोगस लाभार्थी उघडकीस आले.

छाननीअंती जे लाभार्थी अपात्र ठरतील त्यांच्याबाबत माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनानुसार योग्य कारवाई करण्यात येईल, तसेच पात्र ठरणाऱ्या लाभार्थ्यांचा लाभ यापुढेही पूर्ववत सुरु राहील.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाभ घेत असलेल्या लाभार्थींपैकी सुमारे 26 लक्ष लाभार्थी योजनेच्या निकषानुसार पात्र दिसून येत नसल्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाने प्राथमिक माहिती उपलब्ध करुन दिली होती. सदर सुमारे 26 लक्ष लाभार्थी राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील आहेत.

**योजनेत मोठा गैरव्यवहार**

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेत मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. सरकारने राबविलेल्या शोधमोहिमेमध्ये तब्बल 26 लाख 34 हजार बोगस लाभार्थी आढळले आहेत. हे सर्व लाभार्थी प्रत्यक्षात पात्र नसतानाही दरमहा 1500 रुपयांचा निधी घेत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सरकारची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यावर तोडगा म्हणून राज्यभरातील सर्व पात्र लाभार्थ्यांची पुन्हा एकदा ई-केवायसीद्वारे पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या योजनेत एकूण 2 कोटी 63 लाख महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 2 कोटी 41 लाख महिला पात्र ठरल्या. विधानसभा निवडणुकीनंतर शिल्लक राहिलेल्या 11 लाख अर्जांची तपासणी केल्यानंतर 7 लाख 76 हजार अर्ज अपात्र ठरले. जून महिन्यात सरकारने या योजनेचा सखोल आढावा घेण्याचे ठरवले. महिला व बालकल्याण विभागाने सर्व विभागांकडून माहिती मागविल्यानंतर फसवणुकीचा मोठा प्रकार समोर आला.

## 'लाडकी बहीण' योजनेला फसवणुकीचे ग्रहण; अपात्र लाभार्थींमुळे सरकारला बसला 163 कोटींचा फटका




राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ह्यमुख्यमंत्री माझी लाडकी बहीणह्न या महत्त्वाकांक्षी योजनेला आता गैरव्यवहाराचे ग्रहण लागले आहे. फ्ळक अंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, जुलै 2024 ते जुलै 2025 या एका वर्षाच्या काळात अपात्र लाभार्थ्यांना 163 कोटी रुपयांचे वाटप झाल्याचे समोर आले आहे.यामध्ये महिलाच नाही, तर पुरुषांनीही योजनेचा लाभ घेतल्याचे उघड झाले आहे, ज्यामुळे सरकारवर जोरदार टीका होत आहे.आउटलूकने दिलेल्या वृत्तानुसार, माहिती अधिकार कार्यकर्ते अजय बोस यांनी दाखल केलेल्या अजार्नंतर ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. या योजनेचा उद्देश 21 ते 60 वयोगटातील महिलांना दरमहा 1,500 रुपये देऊन त्यांना आत्मनिर्भर बनवणे हा होता. मात्र, अनेक पात्र महिलांना या योजनेतून वगळण्यात आले, तर दुसरीकडे अपात्र व्यक्तींनी याचा गैरफायदा घेतला.

**योजनेतील त्रुटी आणि गैरव्यवहार**

रिपोर्टनुसार, छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्ह्यातच 1.04 लाख अर्ज अपात्र ठरवण्यात आले, ज्यात 84,000 अर्ज कुटुंबातील महिलांची संख्या जास्त असल्यामुळे आणि 20,000 अर्ज वयाचा निकष पूर्ण न केल्यामुळे रद्द झाले.महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी स्वतः या गोष्टीला दुजोरा दिला असून, 26.34 लाख अपात्र लाभार्थ्यांना तात्पुरते निलंबित करण्यात आल्याचे सांगितले आहे. काही प्रकरणांमध्ये कुटुंबातील दोनापेक्षा अधिक महिलांनी, तर काहींनी सरकारी कर्मचारी असूनही लाभ घेतल्याचे समोर आले आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, 14,000 हून अधिक पुरुषांनी बनावट कागदपत्रे वापरून योजनेचा लाभ घेतला. यामुळे राज्याच्या तिजोरीवर 21.44 कोटी रुपयांचा भार पडला. अशाप्रकारे अपात्र व्यक्तींना योजनेचा लाभ घेल्याने विरोधी पक्षांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

# गणेशोत्सवासाठी प्लास्टिक फुलांची दुकाने सजली...!

## फुलशेती कोमेजली, शासनाने प्लास्टिक फूल, हार विक्रीवर बंदी घालावी




**■मुंबई । प्रतिनिधी,**

एकीकडे प्लास्टिक बंदीचा जागर सुरू असतानाच सणामध्ये प्लास्टिक फुलांमुळे नैसर्गिक फुलांकडे कोणी बघत नाही. नैसर्गिक फुलांऐवजी सर्वत्रच हार, तुरे, फुले प्लास्टिकचे वापरला जाऊ लागला आहे. त्यामुळे फुलशेती करणारा शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सवात फुलांना अधिक महत्त्व असते. त्यामुळे सर्वत्रच फुलांना चांगली मागणी होती. ही मागणी ओळखूनच अलीकडे फुलशेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला होता.

यात प्रामुख्याने झेंडू, निशिगंधाची शेती अधिक केली जाते. परंतु या फुलशेतीच्या मुळावर प्लास्टिक फुले आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. चार-पाच वर्षापूर्वी झेंडू आणि निशिगंधला चढ्या दराने मागणी होती. दसरा, गौरी-गणपती, आणि झेंडूला प्रतिकिलो ५० रुपयांपासून २५० रुपयांपर्यंत दर मिळत होता, तर निशिगंधला प्रतिकिलो २०० रुपयांपासून काही हजार रुपयांपर्यंत दर मिळत होता. मात्र विविध उत्सवात प्लास्टिक फुलांचा वापर वाढला आहे. घरगुती गौरी गणपतीसह सार्वजनिक गणेशोत्सवातील आरास सजावटीसाठीही प्लास्टिक फुलांच्या माळांचा वापर वाढला आहे. केवळ सणासुदीत फुले, माळा व गजरे विक्री करून कुटुंबाची गुजराण करणाऱ्या अनेकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. या शिवाय पॉलीहाऊस आणि शेडनेटमध्ये लाखो रुपयांचा खर्च करून फुलशेती केली जाते. फुलांना भाव मिळाला नाही, तर शेतकरी आर्थिक अडचणीत सापडणार आहेत.

अनेक बेरोजगार युवकांचा फुलशेती करण्याकडे कल वाढला आहे. अडीच-तीन महिन्यांच्या फुलशेतीसाठी रोज २४ तास राबावे लागत होते. बाजारात फुले घेऊन गेल्यानंतर दलालांचाही सामना करावा लागतो. त्यातच प्लास्टिक फुलांमुळे बेरोजगार युवकांवर पुन्हा बेकारीची वेळ आली आहे. त्यामुळे सरकारने प्लास्टिक फुलांच्या विक्रीवर बंदी घालावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.प्लास्टिक फुलांमुळे झेंडूच्या फुलांना मागणी कमी झाली. प्रतिकिलो ५ ते १० रुपये मिळतो. उत्पादन खर्चही त्यातून निघत नाही. आर्थिक नुकसान सहन करावे लागले. अनेक वेळा फुलांना दर मिळत नसल्याने फुले रस्त्यावर फेकण्याची वेळ येत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

# थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र 2024 - जनजागृती उपक्रम



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

आज दिनांक २५/०८/२०२५ रोजी आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट च्या वतीने मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर रावसाहेब थोरात कला व वाणिज्य महाविद्यालय, वणी येथे मुक्त महाराष्ट्र 2024 या महत्वाकांक्षी उपक्रमाच्या अंतर्गत थॅलेसिमिया व ॲनिमिया विषयक जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमात प्रो. पांगम सरांनी



थॅलेसिमिया व ॲनिमिया याबद्दल सखोल माहिती दिली. थॅलेसिमिया आजार काय असतो, ॲनिमियाची कारणे व परिणाम काय आहेत याचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण करून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले. या उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे (M.Sc., Ph.D.) यांचे विशेष




मार्गदर्शन लाभले. तसेच आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टचे आरोग्य विभाग सचिव प्रोफेसर प्रकाश पांगम, संस्थापक संयुक्त सचिव गुरुप्रसाद दीपक नाईक, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रवींद्र चव्हाण (Ph.D. in Physician Education), व्यासपीठावर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. वाय. एम. साळुंखे, प्राध्यापक नितीन बोरसे, उमेश देशमुख, तसेच डॉ. जे. डी. पवार आणि श्री. बी. टी. ठाकरे उपस्थित होते.या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रक्तविकारांविषयी जागरूकता वाढली असून आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. पुढील टप्प्यात विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करून आवश्यक ते पुढील उपाय आणि उपचाराची दिशा निश्चित केली जाणार आहे.या उपक्रमाचा उद्देश प्रथम जनजागृती झ नंतर तपासणी झ आणि मग उपचार या संकल्पनेवर आधारित आहे. हाच कार्यक्रम लवकरच मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सर्व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणार आहे.

हा प्रयत्न थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र 2024 या मोठ्या स्वप्नाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

# विश्रांतीनंतर राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढला



**■मुंबई । प्रतिनिधी,**

राज्यात मागील आठवड्यात मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली होती. शेती पिकांचे कोट्यवधींचे नुकसान झाले. मागील दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर आता राज्यात पावसाचा जोर पुन्हा वाढला आहे. हवामान विभागाने (क्टऊ)दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात आणि मध्य प्रदेशात (इं८ ङ्क्ष ईल्लॅ' ंल्ला टॅंट ढश्ॅींरॅं)तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात आगामी दोन दिवसात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यातील काही भागांमध्ये ऑरेंज आणि येलो अलर्ट जारी केला आहे.यामध्ये रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, नंदुरबार, जळगाव, धुळे, नाशिक, परभणी, लातूर, नांदेड, हिंगोली भागात ऑरेंज अलर्ट आणि उर्वरित राज्यात यलो अलर्ट जारी केला आहे. आज आठवड्याच्या पहिल्या दिवशी सकाळीच मुंबईत जोरदार पावसाने हजेरी लावून मुंबईकरांची तारांबळ उडवली. सायनमधील गांधी मार्केट परिसर आणि ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे येथे पाणी साचले होते.विलेपार्ले विमानतळाजवळील वाहतूक बाधित झाली होती.यासंदर्भात विमान कंपन्यांनी प्रवाशांना आवश्यक सूचना दिल्या होत्या. दरम्यान मध्य, पश्चिम आणि हार्बर रेल्वे सेवा सुरळीत सुरु होती. दरम्यान सातपुडा परिसरात मुसळधार पावसामुळे निसारा नदीला पूर आल्याने पुलावर बोलेरो कार पुरात अडकली. या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी प्रयत्न करून पूरात अडकलेले वाहन बाहेर काढले. तर स्थानिक प्रशासनाने खबरदारीचा इशारा देऊन नागरिकांनी नदी, ओढे,पूल ओलांडताना सावधगिरी बाळगण्याची सूचना दिली आहे. या पर्वतरांगांमध्ये झालेल्या पावसामुळे वान धरण ८३.६५ टक्के भरले.सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्याचे दोन दरवाजे उघडून ७३.८६ क्युसेस पाण्याचा विसर्ग केला. संग्रामपूर तालुक्यात पावसाचे प्रमाण ७ टक्क्यांनी वाढून ४१.४२ टक्के झाले तर जळगाव जामोद तालुक्यात ५२ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

# सिंहगडावर बेपत्ता तरुण पाच दिवसांनी सापडला



**■पुणे । प्रतिनिधी,**

पुण्यातील सिंहगड किल्ल्यावरून पाच दिवसांपूर्वी बेपत्ता झालेला गौतम गायकवाड (२४) काल संध्याकाळच्या सुमारास सापडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार त्याची तब्येत स्थिर असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.या प्रकरणात गूढ कायम असल्याने पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने तपास करत आहेत.

गौतम गायकवाड २० ऑगस्ट रोजी महेश शिंदे, हिमांशू शुक्ला, वैष्णवी आलगुडे आणि सूरज माळी या चार मित्रांसह सिंहगड किल्ल्यावर फिरण्यासाठी गेला होता. तानाजी कड्याजवळ लघुशंकेसाठी थांबतो असे सांगून तो बाजूला गेला. मात्र त्यानंतर तो परतलाच नाही. मित्रांनी तात्काळ पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस व बचावपथकाने शोधमोहीम सुरू केली होती.गौतमचे मित्र त्याच्या दरीत पडल्याचा संशय व्यक्त करत होते. त्यानुसार शोधमोहीम कड्याच्या परिसरात सुरु होती.

मात्र या तपासात सिंहगड किल्ल्याच्या पायथ्यावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक तरुण पळत व लपत असल्याचे दिसले. या फुटेजवरून पोलीस अधिकाऱ्यांना हा प्रकार मुद्दाम घडवल्याचा संशय आला. शोध घेतल्यानंतर काल तो सापडला. गौतमने स्वतः गायब होण्यामागचे कारण स्पष्ट केलेले नाही. दरम्यान, गौतमवर तब्बल २० लाख रुपयांपेक्षा जास्त कर्ज असल्याने त्याला वारंवार वसुलीसाठी धमकीचे फोन येत होते. त्यामुळे गौतमने स्वतःच्या मृत्यूचा बनाव रचला नाही ना? असा संशय व्यक्त होत आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# देशातील लोकांना त्यांच्या पात्रतेप्रमाणे नेते मिळतात



लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी काही राज्यांमध्ये मतचोरी झाल्याचा आरोप करत आपल्याकडे त्याचे पुरावे असल्याचा दावा केला. इंडिया आघाडीतील पक्षांची बैठक घेऊन त्यांनी त्याविषयीची कागदपत्रे दाखवली. राहुल गांधी यांनी आरोप केल्यानतंर केंद्रीय निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना त्यांचे आरोप शपथपत्रावर सादर करा, असे आवाहन केले. पण राहुल गांधी त्यासाठी तयार नाहीत, त्यांनी म्हटले आहे की, मी संविधानाची शपथ घेतली आहे, त्यामुळे शपथपत्रावर मी हे आरोप सादर करणार नाही. निवडणूक आयोग ही स्वायत्त संस्था आहे, त्यामुळे त्यांच्याकडून निपक्षपातीपणे काम करणे अपेक्षित आहे, त्यामुळेच त्यांच्यावरील विश्वास टिकून असतो. राहुल गांधी यांच्या आरोपांनंतर निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, ईव्हीएम मशीन हॅक करण्याचे आम्ही आव्हान देतो. राहुल गांधी यांनी अल्पावधीत मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याचा दावा केला आहे. राहुल गांधी यांनी कागदपत्रे दाखवून आरोप केल्यामुळे जनमानसामध्ये मोठी चर्चा सुरू झाली आहे. राहुल गांधी मतदान प्रक्रियेबाबत आरोप करताना महाराष्ट्रातील २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाच्या फरकाचे उदाहरण देतात. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील महाविकास आघाडीला दणदणीत यश मिळाले होते. महाराष्ट्रात मोदींची जादू चालली नाही. त्यामुळे एका बाजूला महाविकास आघाडीच्या पंखात प्रचंड बळ निर्माण झाले होते. काँग्रेसला तर अनपेक्षितरित्या मोठे यश मिळाले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचाच मुख्यमंत्री व्हायला हवा, अशी फिल्डिंग पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखे काँग्रेसचे नेते लावू लागले. त्यामुळे पुन्हा मुख्यमंत्रीपदाचे स्वप्न पाहणारे उद्धव ठाकरे नाराज झाले होते. तुम्ही मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करा, मी त्याला पाठिंबा देतो, हे ठाकरे यांनी तिन्ही पक्षांच्या एका सभेत सांगितले होते, पण ठाकरे यांच्या बोलण्यातील रोष काँग्रेस नेत्यांच्या लक्षात आलेला होता. म्हणून ते जाहीरपणे आपला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करायला तयार नव्हते. लोकसभा निवडणुकीत आपण चारसो पार करणार, असा आत्मविश्वास घेऊन फिरर्णाया पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या महाराष्ट्रातील नेत्यांना लोकसभा निवडणुकीच्या निकालाने मोठा दणका दिला होता. त्यावर काय उत्तर द्यावे, हे भाजपच्या नेत्यांना सुचत नव्हते. चारसो पारचा दावा करत असताना ही अशी अवकळा का आली, याचे विश्लेषण त्यांना करता येत नव्हते. येर्णाया विधानसभा निवडणुकीत आपले काही खरे नाही हे लक्षात आल्यावर राज्यात विधानसभेपूर्वी मध्य प्रदेशातील लाडकी बहनचे मॉडेल लागू करण्यात आले. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना महिना १५०० रुपये देण्यात येऊ लागले. त्यामुळे कुणीही फॉर्म भरले. त्यामुळे कुठलेही नियम पाळण्यात आले नाहीत. अगदी पुरुषांनीसुद्धा लाडकी बहीणचे अर्ज भरले आणि पैसे घेतले. असा महाराष्ट्रात सगळा अंदाधुंद कारभार सुरू होता. आता ही लाडकी बहीण योजना हे राज्यातील महायुतीसाठी अवघड जागेचे दुखणे होऊन बसले आहे. कारण त्या योजनेच्या आधारे विधानसभा निवडणुकीत महायुतीला यश मिळाले, असा महायुतीचा दावा आहे. पण महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडी हे मान्य करायला तयार नाहीत. कारण लोकसभेत तुमचा दारूण पराभव झाला आणि विधानसभा निवडणुकीत असा मोठा फरक कसा काय पडला, असा प्रश्न इंडिया आघाडी विचारत आहे. पण त्याचे समाधानकारक उत्तर कुणालाच देता येत नाही. जो जिता वही सिंकदर, असाच कारभार सुरू आहे. जेव्हा विधानसभा निवडणुकीत राज्यातील महायुतीचा दणदणीत विजय झाला तेव्हा त्यांच्या राज्यातील नेत्यांना इतका आश्चयार्चा अनपेक्षित धक्का बसला होता की, ते रस्त्यावर उतरून जल्लोष करणेही विसरून गेले होते. म्हणजे हा चमत्कार केंद्रीय पातळीवरून घडविण्यात आला होता का, ज्याची राज्यातील नेत्यांना कल्पना नव्हती. पण राज्यात चमत्कार झाला होता. तोच चमत्कार राहुल गांधी यांनी उचलून धरला आहे. त्याचे उत्तर निवडणूक आयोगापेक्षा देवेंद्र फडणवीस आक्रमकपणे देताना दिसत आहेत. त्यामुळे कुठेतरी पाणी मुरल्याची शंका येत आहे. महाराष्ट्रात २०१९च्या विधानसभा निवडणुकीनंतर जे काही सत्तापरिवर्तन झाले आणि भाजप आपल्या मित्र पक्षांसोबत सत्तेवर आली त्याला विविध पदर आहेत. कारण लोकांच्या नजरेला येतील, असे प्रकार घडविण्यात आले होते. त्यात त्यावेळचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भूमिका अतिशय वादग्रस्त ठरली होती. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस कशी फोडण्यात आली ते लोकांनी पाहिले होते. ज्यांच्यामागे भाजपाने भ्रष्टाचारी म्हणून तपास यंत्रणांचा ससेमिरा लावला होता, ते नेते जेव्हा भाजपमध्ये प्रवेशकर्ते झाले तेव्हा त्यांची चौकशी थांबविण्यात आली. यामुळे लोकांच्या मनामध्ये विशेषतः भाजपविषयी राग होता. तोच लोकसभा निवडणुकीतून त्यांनी दाखवून दिला असावा. नुकतीच अमेरिकेतील पहिले मराठी आमदार संतोष साळवी यांची एका वृत्तवाहिनीने मुलाखत घेतली. त्यात त्यांनी अमेरिकेत निवडणूक लढवायला फारसा खर्च येत नाही, असे सांगितले. इतकेच नव्हे तर लाडकी बहीणसारखी योजना अमेरिकेतील जनता मान्य करणार नाही, असे सांगितले. त्यामुळे भारतात निवडणुकीत काय चालते ते कळू शकते. इथे राजकीय नेते लोकांना, संस्थांना विकत घ्यायला तयार असतात, आणि त्याचवेळी समोरचेही विकले जायला तयार असतात. त्यामुळे लोकांना त्यांच्या पात्रतेप्रमाणे नेते मिळतात, हे विधान खरे ठरते.

# सरकारचे डिजिटल क्रीडांगणांकडेही लक्ष



देशात अनेकदा ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून झालेली फसवणूक, त्यामुळे झालेली दयनीय अवस्था अशा घटना नित्याच्याच! अशा खेळांमधून अनेकांची फसवणूक झाली, तर अनेकजण त्याच्या आहारी गेले. यामुळेच केंद्र सरकारने यावर नुकताच कायदा करत, या खेळाचा दुष्परिणाम रोखण्याचा प्रयत्न केला आहे. त्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन गेमिंगचा घेतलेला आढावा... क्रीडाविश्व सदरात वाचला असेल. रमीसदृष्य खेळ ऑनलाईन जाहिरातीमुळे प्रसिद्ध झाले असले, तरी ते योग्य की अयोग्य यावर देशात चर्चा सुरूच आहे, हा भाग त्या लेखात पाहिला. आतापर्यंत ऑनलाईन खेळांचे दोन वर्ग होते. त्यात कौशल्यावर आधारित खेळ कायदेशीर, तर नशिबावर बेतलेले खेळ जुगार मानले जात. त्याच सुमारास केंद्र सरकारशी संबंधित काही मंडळी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात विधेयके मांडत, त्याला नियमांत रूपांतरित करण्याच्या प्रयत्नात होती. आपल्या परिचयातील पत्त्यांच्या खेळांत जवळजवळ ३५० प्रकार रूढ आहेत. यातील अनेकांमध्ये पैशांची थेट देवाणघेवाण करणारे ऑनलाईन गेमिंगसारखे ॲप असतात. त्या ॲपवर ही मंडळी लक्ष ठेवून होती आणि त्यांनी एक विधेयक संमत करून, राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर एक कायदाही अमलात आणला. इंटरनेटद्वारे खेळले जाणारे डिजिटल खेळ, समाजमाध्यमांवरील क्रीडा, ई-स्पोर्ट्स तसेच पैशांवर खेळले जाणारे खेळ, या अर्थक्रीडा खेळल्या जातात ते डिजिटल क्रीडांगण, ऑनलाईन क्रीडागार अशा क्रीडाविश्वातील गैरव्यवहारात केंद्र सरकारने लक्ष घालत, त्यातील अनिष्ट प्रथांना आळा घालणारे विधेयक नुकतेच संमत केले. त्यामुळे ऑनलाईन गेमच्या माध्यमातून चालणार्या पैशांच्या देवाणघेवाणीला, आता आळा बसणार आहे. ऑनलाईन गेमिंग क्षेत्राला योग्य दिशा देणे आणि त्या माध्यमातून होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी, केंद्र सरकारने ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक २०२५ संमत केले आहे. या विधेयकाच्या आधी काही राज्यांमध्ये ऑनलाईन रमीवर बंदी आली, तर काही राज्यांमध्ये ते चक्क कायदेशीर झाले. या रमीच्या बाबतीत काही आस्थापने न्यायालयातही गेली होती. केंद्र सरकारने आणलेल्या या केंद्रीय विधेयकासही, ऑनलाईन गेमिंग कंपन्यांशी संबंधित प्रमुख संघटनांनी विरोध केला आहे. ऑल इंडिया गेमिंग फेडरेशन , ई-गेमिंग फेडरेशन , फेडरेशन ऑफ इंडिया फॅन्टसी स्पोर्ट्स या संघटनांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात, विश्वासात न घेता विधेयक आणल्याचे म्हटले आहे. तसेच, बंदीऐवजी सरकारन ॲपचे नियमन करावे, अशी मागणीही कंपन्यांनी केली आहे. अशा बंदीमुळे अनेक तरुण उद्योजक, गुंतवणूकदारांचे नुकसान होणार असून, दोन लाख नोकर्यांवर टांगती तलवार असल्याचा इशाराही या संघटनांनी दिला. या विधेयकाद्वारे गेमिंग क्षेत्राबाबत राष्ट्रीय पातळीवर एक कायदेशीर चौकट तयार होत आहे. तसेच, कोणत्याही प्रकारे ऑनलाईन खेळाद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने पैशांची देवघेव या प्रकाराला वित्तीय संस्थांनी मदत करणे, या कायद्याचे उल्लंघन केल्याचे मानले जाणार आहे. त्यमुळे कायद्याचे उल्लंघन करणार्यांना दंड आणि शिक्षा ठोठावण्यात येणार आहे. ऑनलाईन गेमिंगमुळे होणार्या आत्महत्या रोखणे, हेच या विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या विधेयकामध्ये जुगार आणि सट्ट्याशी संबंधित सर्वप्रकारच्या ऑनलाईन गेमिंगवर, पूर्ण बंदी घालण्याची तरतूद आहे. खेळाडूस्नेही असलेल्या या विधेयकात, ऑनलाईन जुगार खेळणार्यांना गुन्हेगार मानले गेले नसून, त्यांना चुकीच्या प्रवृत्तीचे बळी मानण्यात आले आहे. या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि खेळांच्या व्याख्या ठरावण्यासाठी एक नियामक प्राधिकरण स्थापन करण्याचीही तरतूद विधेयकात आहे. ऑल इंडिया गेमिंग फेडरेशन , ई-गेमिंग फेडरेशन आणि फेडरेशन ऑफ इंडिया फॅन्टसी स्पोर्ट्स यांसारख्या ऑनलाईन गेमिंग कंपन्या आणि त्यांच्या संघटनांनी, गृहमंत्री अमित शाह यांना संयुक्त पत्र लिहिले आहे. त्यामध्ये या विधेयकामुळे देशभरातील दोन लाखांहून अधिक नोकर्या संपुष्टात येतील आणि ४०० हून जास्त गेमिंग कंपन्या बंद पडतील. त्यामुळे डिजिटल इंडियाच्या प्रतिमेलाही मोठा धक्का बसेल, असे म्हटले आहे. वाचनात आलेल्या एका अहवालानुसार, सरकारला गेमिंग क्षेत्राकडून दरवर्षी २० हजार कोटी रुपये कर मिळतो. भारतात गेमिंगशी संबंधित जवळपास ४०० स्टार्टअप्स सुरू झाले आहेत. यामध्ये २५ हजार कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आली आहे. २०२३ साली सरकारने ऑनलाईन गेमिंगवर २८ टक्के ह्यजीएसटीह्ण आकारला. याशिवाय २०२५ पासून जिंकलेल्या रकमेवर ३० टक्के करही लावला जात आहे. ऑनलाईन गेमिंग व्यवसायात असलेल्या काही कंपन्यांच्या शेअरच्या किमतींमध्ये,घसरण दिसून आली होती. ही घसरण या विधेयकाच्या संभाव्य नकारात्मक परिणामांचे स्पष्ट संकेत देते. वाचनात आलेल्या अन्य एका अहवालानुसार, ऑनलाईन गेमिंगची बाजारपेठ जवळपास ३२ हजार कोटी रुपयांची आहे. यापैकी ८६ टक्के महसूल रोख स्वरूपात येतो. २०२९ सालापर्यंत तो ८० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा होती; पण या बंदीमुळे अनेक कंपन्या अडचणीत येतील. त्यामुळे सरकारचा कोट्यवधी रुपयांचा कर बुडू शकतो. या दोन्ही बाजूंकडे सरकार खचितच बघेल तथापि, आपण तोपर्यंत या लेखात ऑनलाईन गेमिंगचा संक्षिप्त इतिहास थोडयात जाणून घ्यायचा प्रयत्न करू. ऑनलाईन गेमिंगचा इतिहास हा पहिल्या मेनफ्रेम संगणकांपासून सुरू होतो. जसजसे संगणक विकसित होत होते, तसतसे त्यावर खेळांची चाचणी घेण्यासाठी गेम डिझाईन होऊ लागले. नासा पासून ते एमआयटी पर्यंत संगणक आणि इंटरनेटच्या उत्क्रांतीसह गेम विकसित घेऊ लागले. वर्ल्डस फेअर या जागतिक मेळ्यातील डिस्नेलॅण्डच्या इट्स अ स्मॉल वर्ल्ड येथूनच, संगणक आणि ऑनलाईन गेमिंगची कहाणी एकत्रित सुरू झाली. ह्यएनआयएमह्णने गणितीय खेळ खेळण्यासाठी बनवलेल्या निमट्रॉन या संगणकाचे सादरीकरण, त्या जागतिक मेळ्यात साली करण्यात आले. संगणकीय खेळांचा प्रारंभ या निमट्रॉन ने केला, असे मानले जाते. येथूनच संगणक आणि ऑनलाईन गेमिंगची कहाणी सुरू होते. या पाठोपाठ १९५१ साली निम्रोड नावाचा आणि लगेच १९५२ साली ओएसओ (जदज) नावाचा संगणकीय खेळ जगासमोर येतात. अनेक स्टेशनवर खेळता येणारा पहिला गेम म्हणून, स्पेसवॉर हा १९६२ साली जगाला मिळतो. पहिला घरगुती गेम कन्सोल, द ब्राऊन बॉस हा १९६६-६७ साली प्रदर्शित होतो. याच काळात, संगणकांमधील ह्यनेटवर्क इफेटह्ण ही नवीन संकल्पना या क्षेत्रात रुळू लागते. १९६० दशकाच्या उत्तराधार्पासून ते १९९३ सालापर्यंत तीन महत्त्वाच्या तांत्रिक नवकल्पना जन्मास आल्या. आपल्याला तेव्हा होस्ट-आधारित नेटवर्क आणि वेळ-सामायिकरण दिसू लागले, हे दोन्ही आज आपल्याला माहीत असलेल्या इंटरनेटच्या निर्मितीकडे घेऊन जातात. गेमिंग समुदायाद्वारे या तिन्ही नवकल्पना जलद वापरल्या जाऊ लागल्या. १९७३-१९७५ साली ह्यनासाह्णने आपला पहिला गेम तयार केला. नासा च्या इंटर्नसनी तयार केलेला चअनए, हा सुरुवातीच्या फर्स्ट-पर्सन शूटर गेमपैकी एक होता. गेमिंगला सुरुवात होताच १९७३ साली पहिला गेम, अटारी कंपनीचा पोंग विकला गेला. १९७५ साली जॉयस्टिक हिट आर्केड गेम्स येतात, ज्यामुळे गेम खेळण्याच्या पद्धतीत क्रांती घडते. १९७७ साली अटारी व्हीसीएस रिलीज झाला, यामुळे गेम कार्ट्रिजची संकल्पना उघड होते. ब्रिटिश टेलिकॉमने ऑनलाईन गेमिंगला प्रोत्साहन देण्यासाठी, आपली भूमिका बजावण्यास सुरुवात केली. मल्टी-यूजर डंगऑनच्या विकासासह, आपल्याला आभासी जगाचा उदय होताना दिसतो. ब्रिटिश टेलिकॉमने रात्री २ ते सकाळी ७ वाजेपर्यंत, ओपन नेटवर्कवर गेम खेळण्याची परवानगी दिली. १९८० सालच्या दशकात संगणक गेमिंग वर्ल्डआणि संगणक आणि व्हिडिओ गेम्स ही दोन मासिके प्रसिद्ध झाली.

१९८२ साली आपण टाईम मॅगझिन ने घोषित केल्याप्रमाणे द इयर ऑफ द कम्प्युटर वर पोहोचलो आहोत. लास वेगास कन्ज्युमर इलेट्रॉनिस शोमध्ये, विल्यम वॉन मेस्टर यांनी मॉडेम-ट्रान्सफर तंत्रज्ञानाची निर्मिती केली. या तंत्रज्ञानात डेटा ट्रान्समिट करण्यासाठी, टेलिफोन लाईन्सचा वापर केला जातो. गेमर्सना प्रोग्रामरकडून अनेक गेम डाऊनलोड करण्यासाठी याचा वापर होतो. दि. १ जानेवारी १९८३ रोजी इंटरनेट अधिकृतपणे सुरू झाले. त्याने ऑनलाईन गेमिंग सुरू झाले. १९८४ साली बीटनेटने एमएडी विकसित केले. हा जगभरातील संगणक नेटवर्कद्वारे प्रवेश केलेला पहिला गेम होय. एसजीआय डॉगफाईट जो इंटरनेट प्रोटोकॉल वापरणारा पहिला गेम बनला. १९८६ साली तो प्रदर्शित झाला मात्र, ब्रॉडकास्ट पॅकेट्स वापरले जात असल्याने, हा गेम एकाच नेटवर्कपुरता मर्यादित होता. त्याचवर्षी वर्कस्टेशन संगणकांना ग्राफिस क्षमता मिळाल्या. हे घडत आहे, तेव्हा आपल्याकडे द विंडोज सिस्टम्स चे प्रकाशन होत होते. १९८७ साली अटारी मल्टीप्लेअर पार्टीमध्ये सामील झाले. गेमिंगमध्ये डेथ मॅच ची संकल्पना आपल्याला पहिल्यांदाच दिसते. १९८९ हे वर्ष इंटरनेट आणि ऑनलाईन गेमिंगसाठी एक मोठे वर्ष ठरले. आयपी मल्टीकास्ट तेव्हा विकसित झाले आणि इंटरनेटवर गेमिंग शय झाले. सेगाने १९९० साली त्यांची मेगानेट ऑनलाईन गेमिंग सेवा सुरू केली. यामुळे मल्टीप्लेअर ऑनलाईन गेमिंग उपलब्ध झाले. सेगाने त्यांच्या सेगा सॅटर्न आणि सेगा ड्रीमकास्ट सिस्टम मध्ये, ऑनलाईन प्रवेशासाठी नेटलिंकदेखील तयार केली. गेमिंगमध्ये ९० सालच्या दशकातील सर्वांत संस्मरणीय गोष्ट म्हणजे, रोल-प्लेइंग गेम्सचा प्रसार होय. २०००च्या दशकाच्या सुरुवातीला इंटरनेट क्षमता असलेले गेमिंग कन्सोल रिलीज झाले. हा ट्रेंड आजही चालू आहे. २००७ यावर्षी स्मार्टफोन लोकप्रिय होण्यास सुरुवात झाली. मोबाईल गेमिंगमुळे गेमिंग आता मुख्य प्रवाहात लोकप्रिय झाले. मोबाईल गेमिंग हे ऑनलाईन गेमिंगची उत्क्रांतीच ठरली. २०१५ साली जाणकारांनी असा अंदाज व्यक्त केला होता की, कन्सोल गेमिंगपेक्षा मोबाईल गेमिंगमधून जास्त उत्पन्न मिळण्याचा अंदाज आहे.

सरासरी ग्राहकांसाठी व्हर्च्युअल रिॲलिटी अजूनही त्याच्या प्राथमिक अवस्थेत होती. तथापि, फेसबुकने ऑयुलस खरेदी केल्यामुळे, व्हर्च्युअल रिॲलिटीला एक प्लॅटफॉर्म बनवण्याचा ट्रेंड आपल्याला दिसून येत आहे. ऑनलाईन गेमिंगचा इतिहास इंटरनेटच्या इतिहासासारखाच आहे. आपण अजूनही इंटरनेटच्या बाल्यावस्थेत आहोत तसेच, आपण ऑनलाईन गेमिंगच्या बाल्यावस्थेतही आहोत. ऑनलाईन गेमिंगचा एक तपशीलवार इतिहास आहे आणि गेमिंगचे भविष्य कसे उलगडते, हे दिवसेंदिवस पाहणे विस्मयजनक असेल. भारतातील ऑनलाईन गेमिंगमध्ये मोबाईल गेमिंग, ई-स्पोर्ट्स आणि वेब-आधारित गेमिंग प्लॅटफॉर्मसह, डिजिटल गेमिंग क्रियाकलापांचा समावेश आहे. स्मार्टफोनच्या वाढत्या प्रवेशामुळे आणि परवडणार्या इंटरनेट प्रवेशामुळे, हे क्षेत्र भारताच्या डिजिटल मनोरंजन उद्योगातील एक महत्त्वपूर्ण भाग आहे. २०२३ सालापर्यंत अंदाजे ४५० दशलक्ष गेमर्ससह भारताने, जगातील सर्वांत मोठ्या मोबाईल गेमिंग बाजारपेठांमध्ये स्थान मिळवले आहे. डिजिटल गेमिंगचा १९४० सालापासूनचा इतिहास क्रमाक्रमाने विकसित होत असताना, मध्येच कोरोनाचा काळ येतो. त्या काळात घरोघरी अडकलेल्या लोकांना क्रीडांगणांवर जाणे अवघड होते. त्यामुळे घरबसल्या खेळायला लोकांना काहीतरी वेगवेगळ्या खेळांची गरज भासू लागली. आणि या काळातच लोकांना डिजिटल गेमिंगने दिलासा दिला. यातील तज्ज्ञ मंडळी बघता बघता नवनवीन खेळ लोकांसमोर आणतात आणि काही लोक त्या डिजिटल क्रीडांगणात बघता बघता त्याच्या कधी आहारी जातात, हे कोणालाच कळत नाही. या डिजिटल क्रीडांगणातून घराकडे परत बोलवत या चिमण्यांनो परत फिरा रे असे गदिमा गीत सांगणार्यांचे ते छोटेच नव्हे, तर मोठेही ऐकेनासे होतात. मग शेवटी आता सरकार पुढे येते आणि समाजात पसरणारे हे डिजिटल दोष हटवण्याचा प्रयत्न करते. अशा प्रसंगी आता गरज आहे ती, कायद्यातील पळवाटा शोधणार्यांकडे बघायची. कारण, हे खेळ खेळणारे खेळाडू एकटे नाहीत कारण, कोणत्याही क्रीडाप्रकारात त्या क्रीडापटूंना मार्गदर्शन करणारे निष्णात कोच, प्रशिक्षक असतातच. या प्रशिक्षकाला जशा वाटा माहीत असतात, तशाच पळवाटाही माहीत असतात. आता या ऑनलाईन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक २०२५ मुळे गेमर्सना आपण कदाचित रोखू, पण गेमर्सबरोबर त्यांच्या प्रशिक्षकांकडेही डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवायला लागेल.

भारत आपल्या देशात ऑलिम्पिक भरवण्याच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी सरकार देशातील क्रीडांगणे क्रीडागारे याकडे लक्ष केंद्रित करत असताना सरकारने एकीकडे हेदेखील दाखवून देण्याचा प्रयत्न केला की, डिजिटल क्रीडांगणाकडेही आमचे बारीक लक्ष आहे. अशा परिस्थितीत या खेळांमध्ये आपले आजचे सरकार कसे सदा जिंकत राहील हे बघत, यासाठी आपल्या सगळ्यांची साथ आपण त्यांना देणे गरजेचे असणार आहे आणि ती सरकारला मिळेल अशी मला खात्री आहे.



# सीझर पुरता गाळात...

इंग्रजीत एक म्हण प्रसिद्ध आहे ती म्हणजे सीझरची पत्नी संशयाच्या पलीकडे असली पाहिजे. आपल्याकडे हे वचन वारंवार वापरण्यात येते. सीझर पुरता गाळात अडकला आहे याची आठवण अनिल अंबानी प्रकरणावरून येते. कारण अनिल अंबानी जे की जगप्रसिद्ध अंबानी घराण्याचे वंशज आहेत आणि मुकेश अंबानी या जगातील अतिश्रीमंत व्यक्तीचे धाकटे भाऊ आहेत त्यांची अवस्था सध्या केविलवाणी झाली आहे. अनिल अंबानी हे सध्या १७ हजार कोटी रुपयांच्या फसवणूक प्रकरणात अडचणीत सापडले आहेत आणि केंद्रीय तपास यंत्रणांनी त्यांच्याशी संबंधित ठिकाणांवर छापे टाकले आहेत. आता ते या प्रकरणातून सुटतील की नाही हे सर्वस्वी कायदेशीर प्रक्रियेवर आणि तपासातून समोर येणा[illegible]या पुराव्यांवर आधारित आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया यांनी अंबानी आणि त्यांच्या आर कॉम विरोधात तक्रार नोंदवली आणि त्यासंबंधात अंबानी यांना आता धावपळ करावी लागत आहे. यापूर्वी सक्तवसुली संचालनालयाने त्यांच्यावर मनी लॉंड्रिंग प्रकरणात चौकशी केली होती. अर्थात या प्रकरणी पुढे काय होऊ शकते हे सर्वस्वी काय पुरावे मिळतात यावर अवलंबून आहे. जर पुरावे भरभक्कम असतील, तर अनिल अंबानी यांना कायदेशीर कारवाईला तोंड द्यावे लागू शकते. अंबानी यांच्या कंपन्यांनी कर्ज कशाप्रकारे वळवले आणि कुठून घेतले याचा तपास केला जाईल. अनिल अंबानी हे देशातील नामांकित उद्योगपती आहेत आणि प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांचे भाऊ आहेत. त्यामुळे त्यांच्यावरील कारवाई ही अंबानी घराण्याला मोठा धक्का आहे असे मानले जात आहे, केवळ इतकेच नव्हे तर उद्योग जगताला धक्का आहे. अर्थात अंबानी यांच्यावर कारवाई केली जाण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी म्हणजे २०२३ सालीही सक्तवसुली संचालनालयाने अनिल अंबानी यांच्यावर कारवाई केली होती आणि त्या तपासात ईडीला अनेक अनियमितता आढळून आल्या होत्या. कोणतीही शहानिशा न करता कंपन्याना कर्ज देणे आणि आवश्यक कागदपत्रे नसणे आणि शेल कंपन्यांच्या नावावर कर्ज मंजूर करणे अशा त्या अनियमितता होत्या, पण सध्याचे प्रकरण हे एसबीआयशी संबंधित आहे आणि म्हणून ते जास्त अंबानींचा पाय खोलात जाणारे ठरले आहे. मुंबईतील कफ परेड येथील निवासस्थानी अंबानी यांच्यावर छापेमारी करण्यात आली. त्यामुळे सर्व देशात खळबळ उडाली. अंबानी यांच्यावर आणि त्यांच्या आर कॉमवर गुन्हेगारी कट रचणे, बँकेची फसवणूक केल्याचा आरोप आहे आणि या घोटाळ्यामुळे बँकेला २९२९.०५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे आरोपपत्रात म्हटले आहे. अर्थात अनिल अंबानी यांनी आपल्यावरील सर्व आरोप नाकारले आहेत. सीबीआयच्या कारवाईनंतर आपल्याला एकट्यालाच बाहेर काढण्यात आले आणि त्यांना त्यांचे म्हणणे ऐकूनही घेतले नाही. शिवाय अंबानी यांचे म्हणणे असे आहे, की जेव्हा हा घोटाळा झाला तेव्हा आपण आपल्या व्यवस्थापनाच्या निर्णयांमध्ये कसलाही सहभाग नव्हता. पण खरा गंभीर आरोप हा आहे, की अंबानी यांच्या कंपनीविरुद्ध जानेवारी २०२१ मध्ये तक्रार केली होती आणि त्यात म्हटले होती, की अंबानी यांचे खाते फसवणूक म्हणून वर्गीकृत केले गेले होते. याला अंबानी काय उत्तर देणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे. अनिल अंबानी यांचे म्हणणे असे आहे की आपल्याला सुनावणीची संधी दिली नाही, तर सीबीआयने म्हटले आहे, की अंबानी आणि त्यांच्या आर कॉमने अनेक घोटाळे केले आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे, की अनिल अंबानी हे काही कंपनीचे बोर्ड मेंबर नव्हते आणि त्यामुळे ईडीच्या कृतीचा काहीही परिणाम होणार नाही. पण यामुळे रिलायन्स उद्योगसमूहाची अप्रतिष्ठा झाली आहे. त्यामुळे त्यांच्यावरील ईडीच्या कारवाईच्या प्रशासनावर अथवा व्यवसायावर कोणताही परिणाम होणार नाही असे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे म्हणणे असले तरीही रिलायन्सचे नाव बदनाम झाले आहे. या सर्व प्रकरणात अति गंभीर बाब म्हणजे एसबीआयनंतर बँक ऑफ इंडियाने फसवे म्हणून घोषित केले आहे. एका नोटिसीत अनिल अंबानी आणि मंजरी आशिक काकर यांच्या कर्ज खात्यांना फसवणूक म्हणून टॅग करण्यात आले. अंबानी उद्योगसमूह, बिर्ला आणि टाटा यांच्यासारखे काही उद्योग सोडले, तर भारतातील उद्योग फारसे नावारूपाला आलेच नाही. जे आले त्यांनाही भाऊ बंदकीने ग्रासले आहे. त्यामुळे अंबानी हा एकमेव उद्योग असा होता की ज्याची तोफ बुलंद होती आणि मुकेश अंबानी हे तर आज सर्वात धनाढ्य व्यक्ती आहेत भारतात नव्हे तर जगात. त्यामुळे उद्योग जगताची नामुष्की झाली आहे. यातही अनिल अंबानी यांचे पतन तर फारच क्लेशदायक आहे. कारण एकेकाळी ट्रिलियन रुपयांच्या मालकीचा उद्योगसमूहाचा मालक असलेले अनिल अंबानी आज आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनिल अंबानी यांच्या कारकीर्दीर्ला हा मोठा धक्का असून रिलायन्सची प्रतिष्ठा धोक्यात आली आहे. अनिल अंबानी यांच्याशी संबंधित ५० कंपन्या आणि कित्येक लोकांवर धाडी टाकण्यात आल्या आणि तेथेच अनिल अंबानी यांचे ग्रह फिरले. ईडीच्या धाडीनंतर रिलायन्स पॉवरचे शेअर्सचे भाव पाच टक्क्यांनी कोसळले आणि जरी अंबानी यांनी आर कॉम किंवा आरएचएलएफशी कोणतेही आर्थिक संबंध असल्याचे नाकारले आहे, तरीही यात कुठेतरी पाणी मुरते आहे हे सर्वांनाच ठाऊक आहे. रिलायन्स इन्फ्रा बोर्डवर अनिल अंबानी नाहीत आणि बोर्ड सदस्यही नाही असे रिलायन्सने अधोरेखित केले असले तरीही सत्य त्यामुळे लपून राहत नाही. आता अनिल अंबानी यांना सत्य काय त्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे. तोपर्यंत अनिल अंबानी यांना कायदेशीर लढाईची तयारी करावी लागेल.

# हरतालिका पूजेसाठी मातीचे शिवलिंग कसे करावे?

भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीयेला हरतालिकेचे व्रत केले जाते. महिलांसाठी या सणाचे विशेष महत्त्व असते. कारण विवाहित महिला सौभाग्य, ऐश्वर्य आणि सुखसमृद्धीसाठी हे व्रत करतात. तर अविवाहित मुली चांगला जोडीदार मिळावा यासाठी हे व्रत करतात. गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी हरतालिकेचा उपवास केला जातो. यंदा 26 ऑगस्टला हरतालिका साजरी केली जाणार आहे. तर हरतालिका पूजनाचा शुभ मुहूर्त हा मुहूर्त 26 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 05 वाजून 56 मिनिटांपासून ते सकाळी 08 वाजून 31 मिनिटांपर्यंत आहे.

या दिवशी महिला माती किंवा वाळूपासून शिवलिंग तयार करून त्याची पूजा करतात. मातीपासून बनवलेल्या शिवलिंगाची पूजा केल्याने उपवासाचा पूर्ण लाभ होतो आणि शिव-पार्वतीचे आशीर्वाद मिळतात अशी मान्यता आहे. त्यासाठी हे शिवलिंग कसे तयार करावे हेच आपण आज जाणून घेऊया...

असे बनवा मातीचे शिवलिंगः

शिवलिंग बनवण्यासाठी चांगली माती किंवा वाळू घ्या.

तुम्ही तुमच्या घरातील कुंडीतील माती देखील वापरू शकता.

या मातीमध्ये कचरा असल्यास स्वच्छ करावा.

नंतर या मातीत थोडे गंगाजल आणि कच्चे दूध घाला आणि चांगले मिसळा, माती जास्त सैल करू नये.

त्यानंतर ज्या चौरंगावर पूजा करायची आहे त्यावर खाली बेलपत्र ठेवावे.

या बेलपत्रावर आता मातीला आकार देऊन शिवलिंग तयार करून घ्यावे.

यानंतर शिवलिंगावर अभिषेक करून पूजेला सुरुवात करावी.

हे लक्षात ठेवाः

हरतालिकाला छोट्या शिवलिंगाची पूजा करण्याचा नियम आहे. त्यामुळे शिवलिंग मोठे नसावे.

शिवलिंग पूजेच्या दिवशीच बनवावे.

पूजा संपल्यानंतर, मातीचे शिवलिंग दुसऱ्या दिवशी सकाळी विसर्जित केले जाते. ते वाहत्या पाण्यात विसर्जित करणे सर्वोत्तम मानले जाते.

वाहत्या पाण्यात विसर्जित करणे शक्य नसल्यास कुंडीत किंवा झाडाच्या मुळाशी विसर्जित करू शकता.

शिवलिंगाचे महत्त्व

मातीचे शिवलिंग घरी बनवणे शुभ मानले जाते. कारण माती ही पंचमहाभूतांचे प्रतीक मानली जाते. भगवान शंकरांना पंचमहाभूतांचे स्वामी म्हंटले जाते. त्यामुळे या मातीपासून बनवलेल्या शिवलिंगाची पूजा हरतालिकेच्या दिवशी केल्याने शुभ फळ मिळते. तसेच हे शिवलिंग पर्यावरणपूरक असल्याने सहजपणे विसर्जित केले जाऊ शकते.



# यंदा हरतालिकेचा मुहूर्त कधी? वाचा पौराणिक कथा आणि पूजेचा विधी

भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीयेला हरतालिकेचे व्रत केले जाते. महिलांसाठी या सणाचे विशेष महत्त्व असते. कारण विवाहित महिला सौभाग्य, ऐश्वर्य आणि सुखसमृद्धीसाठी हे व्रत करतात. तर अविवाहित मुली चांगला जोडीदार मिळावा यासाठी हे व्रत करतात. गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी हरतालिकेचा उपवास केला जातो. यंदा 26 ऑगस्टला हरतालिका साजरी केली जाणार आहे.

हरतालिका पूजा मुहूर्त

सर्वात आधी आपण यंदा हरतालिका पूजेचा मुहूर्त कधी असणार आहे ते पाहूया.. तर हरतालिकेची तृतीयेची तिथी 25 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 12 वाजून 34 मिनिटांनी सुरू होणार आहे. तर 26 ऑगस्टला दुपारी 01 वाजून 54 मिनिटांनी ही तिथी संपणार आहे. यंदा हरतालिका पूजनाचा शुभ मुहूर्त हा मुहूर्त 26 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 05 वाजून 56 मिनिटांपासून ते सकाळी 08 वाजून 31 मिनिटांपर्यंत आहे.

हरतालिकेची पौराणिक कथा

पौराणिक कथेनुसार, देवी पार्वतीने वाळूचे शिवलिंग बनवून भगवान शंकरांना पती म्हणून मिळविण्यासाठी कठोर तप केले. पार्वतीचे वडील राजा हिमवान हे भगवान विष्णूसोबत देवी पार्वतीचे लग्न लावणार होते. मात्र पार्वतीने मनातून शंकरांना आपले पती म्हणून स्वीकारले होते. यासाठी भाद्रपद महिन्यातील तृतीया तिथीच्या दिवशी, पार्वतीने आपल्या सखींच्या मदतीने निर्जल उपवास केला आणि शंकराची आराधना केली. यामुळे शंकर प्रसन्न झाले आणि त्यांनी पार्वतीच्या इच्छेनुसार विवाह करण्यास होकार दिला. यामुळे हरतालिकेच्या दिवशी महिला भगवान शंकरासारखा पती मिळावा किंवा आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळावे यासाठी उपवास करतात. या दिवशी महिला शिव-पार्वतीची पूजा करतात आणि हरतालिकेची कथा वाचतात किंवा ऐकतात.

हरतालिकेचे धार्मिक महत्त्व

हरतालिका व्रत हे स्त्रियांच्या अखंड सौभाग्यासाठी पाळले जाते. विवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्यासाठी हे व्रत करतात, तर अविवाहित मुली चांगल्या पतीच्या प्राप्तीसाठी उपवास करतात.

हरतालिका पूजेचा विधी

हरतालिकेची पूजा करण्यासाठी सर्वात आधी चौरंगावर लाल कापड टाकून वाळूपासून शिवलिंग बनवून घ्या.

पार्वती, गणपती आणि शंकराची प्रतिमा तिथे ठेवा. बाजारात हरतालिकेच्या पूजनासाठीच्या मूर्ती मिळतात.

चौरंगाच्या बाजूला समई लावून घ्यावी. चौरंगावर उजव्या हाताला तांदळापासून अष्टकमल तयार करुन त्यावर कलश ठेवा. कलशवर स्वस्तिक काढा आणि त्यात पाणी भरा. त्यात सुपारी, नाणे आणि हळद घाला. त्यावर नारळ ठेवा.

मूर्तींचा अभिषेक करावा आणि त्यानंतर देवी पार्वतीला सौभाग्याच्या वस्तू अर्पण कराव्यात. पत्री आणि फुले अर्पण करावीत. कापसाचे वस्त्र अर्पण करावे.

निरांजनाने आरती करावी. पंचामृत, गुळखोबरे आणि आणखी एखाद्या गोड पदार्थाचा नैवेद्य दाखवावा.

तसेच हरतालिका व्रतादरम्यान 16 श्रृंगाराला महत्त्व आहे.

असे बनवा मातीचे शिवलिंगः

शिवलिंग बनवण्यासाठी चांगली माती किंवा वाळू घ्या.

तुम्ही तुमच्या घरातील कुंडीतील माती देखील वापरू शकता.


या मातीमध्ये कचरा असल्यास स्वच्छ करावा.

नंतर या मातीत थोडे गंगाजल आणि कच्चे दूध घाला आणि चांगले मिसळा, माती जास्त सैल करू नये.

त्यानंतर ज्या चौरंगावर पूजा करायची आहे त्यावर खाली बेलपत्र ठेवावे.

या बेलपत्रावर आता मातीला आकार देऊन शिवलिंग तयार करून घ्यावे.

यानंतर शिवलिंगावर अभिषेक करून पूजेला सुरुवात करावी.



# अविवाहित मुलींनी हरतालिका व्रत करावे का?

भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील तृतीयेला हरतालिकेचे व्रत केले जाते. विवाहित महिला सौभाग्य, ऐश्वर्य आणि सुख-समृद्धीसाठी हे व्रत करतात. याशिवाय पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि आनंदी वैवाहिक जीवनासाठी हरतालिका व्रत केले जाते. गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवशी हरतालिकेचा उपवास केला जातो. पण, हे व्रत अविवाहित मुलींनी करावे का, याचे फायदे काय आहेत जाणून घेऊयात.

व्रत करावे का?

हरतालिकेचे व्रत विवाहित महिलांसाठी जितके महत्त्वाचे आहे, तितकेच अविवाहित मुलींसाठी खास मानला जातो. असे सांगितले जाते की, हे व्रत केल्याने अविवाहित मुलींना एक चांगला आणि इच्छित वर मिळतो, असे म्हटलं जातं. भगवान शिव आणि पार्वती देवी यांच्या मिलनाचे स्मरण करण्यासाठी हा सण साजरा केला जातो.

हरतालिका पूजा मुहूर्त

हरतालिकेची तृतीयेची तिथी 25 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 12 वाजून 34 मिनिटांनी सुरू होणार आहे. तर 26 ऑगस्टला दुपारी 01 वाजून 54 मिनिटांनी ही तिथी संपणार आहे.

यंदा हरतालिका पूजनाचा शुभ मुहूर्त हा मुहूर्त 26 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 05 वाजून 56 मिनिटांपासून ते सकाळी 08 वाजून 31 मिनिटांपर्यंत आहे.

हरतालिकेची पौराणिक कथा

पौराणिक कथेनुसार, देवी पार्वतीने वाळूचे शिवलिंग बनवून भगवान शंकरांना पती म्हणून मिळविण्यासाठी कठोर तप केले. पार्वतीचे वडील राजा हिमवान हे भगवान विष्णूसोबत देवी पार्वतीचे लग्न लावणार होते. मात्र पार्वतीने मनातून शंकरांना आपले पती म्हणून स्वीकारले होते. यासाठी भाद्रपद महिन्यातील तृतीया तिथीच्या दिवशी, पार्वतीने आपल्या सखींच्या मदतीने निर्जल उपवास केला आणि शंकराची आराधना केली. यामुळे शंकर प्रसन्न झाले आणि त्यांनी पार्वतीच्या इच्छेनुसार विवाह करण्यास होकार दिला. यामुळे हरतालिकेच्या दिवशी महिला भगवान शंकरासारखा पती मिळावा किंवा आपल्या पतीला दीर्घायुष्य मिळावे यासाठी महिला हा उपवास करतात. या दिवशी महिला शिव-पार्वतीची पूजा करतात आणि हरतालिकेची कथा वाचतात किंवा ऐकतात.

# हरतालिका व्रत का पाळले जाते?

हरतालिका व्रत विवाहित महिलांनी अखंड सौभाग्य आणि पतीच्या दीर्घायुष्याची कामना करण्यासाठी पाळले जाते. हे व्रत भगवान शिव आणि माता पार्वती यांना समर्पित आहे आणि धार्मिक श्रद्धेनुसार, हे व्रत केल्याने वैवाहिक जीवनात आनंद, शांती आणि समृद्धी येते.

हरतालिका व्रत का पाळले जातेः

अखंड सौभाग्य प्राप्तीः

विवाहित महिला आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी हे व्रत पाळतात.



पतीचे दीर्घायुष्यः

असे मानले जाते की या व्रताच्या परिणामामुळे पतीला दीर्घायुष्याचे आशीर्वाद मिळतात.

सुखी वैवाहिक जीवनः

पती-पत्नीमधील प्रेम आणि स्नेह टिकवून ठेवण्यासाठीही हे व्रत उपयुक्त मानले जाते.

माता पार्वतीचे आशीवार्दः

हे व्रत आई पार्वतीला समर्पित आहे आणि असे मानले जाते की हे व्रत केल्याने माता पार्वतीचे आशीर्वाद मिळतात.

कठोर तपश्चयेर्चे प्रतीकः

हरतालिका तीजचे व्रत पाणी न पिता पाळले जाते, जे देवी पार्वतीने भगवान शिव यांना पती म्हणून मिळविण्यासाठी केलेल्या कठोर तपश्चयेर्चे प्रतीक आहे.

हरतालिका व्रतः

भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीया तिथीला हे व्रत केले जाते. या दिवशी महिला भगवान शिव आणि देवी पार्वतीची पूजा करतात आणि निर्जला व्रत करतात.

हरतालिका व्रत कथाः

आख्यायिकेनुसार, देवी पार्वतीने भगवान शिव यांना पती म्हणून मिळविण्यासाठी कठोर तपश्चर्या केली. तिने अन्न आणि पाणी न घेता घनदाट जंगलात वाळूपासून शिवलिंग बनवून भगवान शिव यांची पूजा केली. तिच्या मैत्रिणींनी तिचे अपहरण केले, म्हणूनच या तीजला हरतालिका तीज म्हणतात.

उपवासाचे महत्त्वः

हे व्रत महिलांसाठी खूप महत्वाचे मानले जाते. ते केवळ त्यांच्या पतींना चांगले आरोग्य आणि दीर्घायुष्य मिळवून देत नाही तर त्यांचे वैवाहिक जीवन देखील आनंदी बनवते.

# हरतालिका व्रत कधी सोडावे?

भाद्रपद शुक्ल पक्षाच्या तृतीयेला साजरे होणारे हरतालिका व्रत सूर्योदयानंतर दुसऱ्या दिवशी सोडले जाते. व्रत पारण, म्हणजेच ते सोडणे, चतुर्थी तिथीला सूर्योदयानंतर केले जाते.

उपवास सोडण्याची पद्धतः

सूर्योदयानंतरः

हरतालिका व्रत सूर्योदयानंतर सोडले जाते.

पूजेनंतरः

सूर्य उगवल्यानंतर, सकाळची पूजा करून उपवास सोडला जातो.

काकडी किंवा काकडीः

काही लोक उपवास सोडण्यासाठी काकडी किंवा काकडी खातात

इतर अन्नः

यानंतर, व्रत करणारा (उपवास करणारा) इतर सामान्य अन्न खाऊ शकतो.

उपवास करताना लक्षात ठेवण्याच्या गोष्टीः

निर्जला व्रतः

हरतालिका तीजचा उपवास निर्जला (पाणी न पिता) ठेवला जातो.

रात्रभर जागरणः

उपवासाच्या काळात, रात्रभर जागरण करावे लागते आणि भगवान शिव आणि देवी पार्वतीची पूजा करावी लागते.

राग टाळावाः

उपवासाच्या काळात राग किंवा नकारात्मक विचार मनात येऊ नयेत.

# हरतालिकेच्या दिवशी आपल्या राशीनुसार निवडा साडीचा रंग, मिळेल अखंड सौभाग्य सुख समृद्धी..!

भगवान शिवपार्वतीची पूजा करून सर्व महिला हरतालिका व्रत करतात. हे व्रत आपल्या सांसारिक सुखासाठी सौभाग्यासाठी महत्वाचे असल्याचे शास्त्रात सांगितले जाते. माता पार्वतीने भगवान शिवासोबत विवाह करण्यासाठी हे व्रत केल्याची पौराणिक कथा आहे. त्यामुळे अनेक महिला हे व्रत निर्जल किंवा फळे खाऊन करतात. शिवलिंगाची पूजा करून देवी पार्वतीला नमन केले जाते तसेच हरतालिका पूजनाची कथा यावेळी वाचली जाते. ही पूजा करताना महिला सोळा शृंगार करून व्रत करतात. पारंपरिक रीतीने साडी नेसतात. मात्र ज्योतिषशास्त्रानुसार महिलांनी जर आपल्या राशीनुसार साडीचा रंग निवडला तर त्यांच्यावर देवीची कृपा होते आयुष्यात सुख समृद्धी येते व अखंड सौभाग्य प्राप्ती होते अशी मान्यता आहे. पाहुयात कोणत्या राशीसाठी कोणता रंग शुभ आहे.

मेष - मेष राशीच्या महिला हरतालिकेच्या दिवशी लाल रंगाची साडी नेसू शकतात. हा रंग सौभाग्याचा रंग मानला जात असल्याने आजच्या दिवशी लाल रंग परिधान करणे तुमच्यासाठी शुभ ठरेल.

वृषभ - वृषभ राशीच्या महिलांनी हरतालिकेच्या दिवशी पिवळ्या रंगाची साडी नेसणे त्यांच्यासाठी शुभ असेल. यामुळे तुमच्या वैवाहिक नात्यात मधुरता आणि प्रेम टिकून राहील.

मिथुन - मिथुन राशीच्या महिला हरतालिकेच्या हिरव्या रंगाची साडी नेसू शकतात. ज्योतिषशास्त्रानुसार यामुळे कुंडलीतील बुधाची स्थिती मजबूत होते असे मानतात.

कर्क - कर्क राशीच्या महिला हरतालिकेच्या दिवशी चंदेरी रंगाची साडी नेसू शकतात. यामुळे तुमच्या आयुष्यात सुख शांती येईल अशी मान्यता आहे.

सिंह - सिंह राशीच्या महिलांनी हरतालिकेच्या दिवशी लाल किंवा गुलाबी रंगाची साडी नेसावी यामुळे तुमच्या आयुष्यात प्रेम तर वाढेलच शिवाय जोडीदारासोबत नाते अधिक घट्ट होईल.

कन्या - कन्या राशीच्या महिला हरतालिकेच्या दिवशी निळ्या रंगाची साडी नसल्याने त्यांच्यासाठी शुभ ठरू शकते. यामुळे वैवाहिक जीवन आनंदी राहील.

वृश्चिक - वृश्चिक राशीच्या महिलांनी हरतालिकेच्या दिवशी गुलाबी रंगाची साडी नेसावी संसारात आनंद आणि समृद्धी येईल.

धनु - धनु राशीच्या महिलांनी हरतालिकेच्या दिवशी पिवळ्या रंगाची साडी नसल्याने सौभाग्य वाढेल व आयुष्यात लक येईल.

मकर - मकर राशीच्या महिलांनी हरतालिकेच्या दिनी निळ्या रंगाची साडी नसल्याने त्यांच्या वैवाहिक नात्यात प्रेम वाढते असे मानतात.



कुंभ - कुंभ राशीच्या महिलांनी हरतालिकेच्या दिवशी जांभळ्या रंगाची साडी नेसावी असे सांगतात. यामुळे नात्यातील कटुता दूर होईल.

मीन - मीन राशीच्या महिलांनी हरतालिकेच्या दिनी गुलाबी रंगाची साडी नेसावी. यामुळे त्यांच्या वैवाहिक जीवनावर कोणाची वाईट दृष्टी पडत नाही.

# हरतालिका उपवासात काय खावे?

हरतालिका उपवासात फलाहार (फळे आणि दुग्धजन्य पदार्थ) आणि सात्विक अन्न सेवन करावे. जर तुम्ही निर्जला उपवास ठेवू शकत नसाल तर तुम्ही फळे, दूध, दही, नारळ पाणी, लस्सी, पनीर, ताक, साबुदाणा, बटाटे आणि पाण्याचे चेस्टनट घेऊ शकता. याशिवाय बदाम, काजू, मनुका यांसारखे सुके फळे देखील खाऊ शकता.

उपवासात काय खावेः

फळेः सफरचंद, आंबा, डाळिंब, पेरू, केळी, पपई, टरबूज, संत्री इ.

दूध आणि दुग्धजन्य पदार्थः दूध, दही, लस्सी, पनीर, ताक.

इतरः साबुदाणा, बटाटे, पाण्याचे चेस्टनट, नारळ पाणी, सुके फळे (बदाम, काजू, मनुका).

रसः हंगामी फळांचा रस.

उपवास सोडल्यानंतर काय खावेः

फळेः उपवास सोडल्यानंतर, प्रथम फळे खावीत, विशेषतः हंगामी फळे.



दूध आणि दुग्धजन्य पदार्थः दूध, दही, खीर इ.

इतरः सुकामेवा, हलके घरगुती मिठाई, डाळ, भात, रोटी, भाजी (हलके अन्न).

लक्षात ठेवण्याच्या गोष्टीः

काही वेबसाइट्सनुसार, उपवासाच्या काळात जास्त गोड किंवा तेलकट पदार्थ टाळावेत.

द्रव पदार्थ हळूहळू सेवन करावेत.

उपवास सोडल्यानंतरही हलके अन्न खावे.

जर तुम्ही गर्भवती असाल किंवा आरोग्याशी संबंधित कोणतीही समस्या असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# खड्डे बुजवण्याची जबाबदारी 'बीएमसी'वर; अन्य प्राधिकरणांकडून खर्च वसूल करण्याचा पालिकेचा निर्णय



**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

पावसामुळे मुंबईच्या रस्त्यांवरील खड्डे वाढून त्यांची अवस्था अधिक वाईट झालेली असतानाच मंगळवारी गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वी सर्व खड्डे बुजवण्याचे आदेश राज्य सरकारने मुंबई महापालिकेला (बीएमसी) दिले आहेत. यामध्ये अन्य प्राधिकरणाच्या हद्दीतील खड्ड्यांचाही समावेश आहे. एमएसआरडीसीच्या हद्दीत असलेल्या वाकोला पुलावर सातत्याने खड्डे पडत असून ते बुजवण्यासाठी बराच खर्च येणार आहेत. अशा मोठ्या स्वरुपाच्या कामाचा मोबदला त्या त्या प्राधिकरणांकडे मागणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. जून महिन्यापासून खड्ड्यांच्या आठ हजारांपेक्षा अधिक तक्रारी मुंबई महापालिकेकडे आल्या असून त्यापैकी पन्नास टक्के तक्रारी ऑगस्ट महिन्यातील आहेत. यातील ८५०पेक्षा जास्त तक्रारी या अन्य प्राधिकरणांच्या हद्दीतील रस्ता किंवा पुलांवरील खड्ड्यांसंबंधी आहेत. मुंबईत एमएमआरडीए, एमएमआरसीएल, म्हाडा, बीपीटी, रेल्वे, विमानतळ अशी अनेक प्राधिकरणे असून त्यावरील तक्रारीही मुंबई महापालिकेकडे येतात. मात्र यंदा वाकोला पुलावरून खड्ड्यांमुळे या प्राधिकरणांमधील जबाबदारीच्या हद्दीचा वाद वाढला आहे.

पश्चिम द्रुतगती मार्गाची देखभाल मुंबई महापालिका करीत असली तरी त्यावरील पुलांची देखभाल ही एमएसआरडीसीची जबाबदारी आहे. त्यामुळे मुंबई महापालिका या पुलाच्या देखभालीची जबाबदारी घेत नाही. परंतु, राज्य सरकारने मुंबई महापालिकेला अन्य सर्व प्राधिकरणांच्या हद्दीतील खड्डे भरण्याचे आदेशच दिले आहेत. दरम्यान, याबाबत पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुंबईतील बीपीटी, विमानतळ प्राधिकरण, रेल्वे यांच्या हद्दीतील रस्त्यांची देखभाल मुंबई महापालिका कधीही करत नाही. मात्र म्हाडा, एमएसआरडीसीच्या हद्दीतील रस्त्यावरील खड्डे बुजवले जातात. बीकेसीची जबाबदारीही एमएमआरडीए घेत असल्यामुळे तिथेही महापालिकेची यंत्रणा नसते. यंदा मात्र एमएसआरडीसीच्या हद्दीतील वाकोला आणि विक्रोळी पुलावरील खड्डे भरण्याची जबाबदारी महापालिकेवर आहे. त्याचे कामही सुरू झाले आहे. तसेच मानखुर्द येथील म्हाडाच्या महाराष्ट्र नगर येथील खड्डेही बुजवले जात आहेत. तर दहिसर येथील सेवा रस्त्यांवर एमएमआरसीएलच्या कामामुळे झालेले खड्डेही मुंबई महापालिका बुजवत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

वाकोला पुलाची दुर्दशा झाली असून एक खड्डा बुजवला तरी दुसरा खड्डा दुसरीकडे पडतो आहे. त्यामुळे या पुलाचे फेरपृष्ठीकरण करण्याची गरज असून ही कामे पावसाळ्याची आधी करावी लागतात. आता अचानक जबाबदारी दिल्यामुळे खडडे दिसतील तसे बुजवावे लागणार आहेत. हे काम पावसाळा संपेपर्यंत चालणार असून त्यानंतर एकूण खर्च संबंधित प्राधिकरणाला कळवला जाणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

बीएमसीच्या संकेतस्थळावरील तक्रारी

खड्ड्यांच्या एकूण तक्रारी - ८,७९९

अन्य प्राधिकरणाच्या रस्त्यावरील खड्डे - ८५५

ऑगस्टमधील तक्रारी - ४,४६९

## रेल्वे प्रवाशांना दिवाळीतील तिकिटे काढता येईनात रेल वन, आयआरसीटीसी संकेतस्थळ




**■मुंबई। प्रतिनिधी:**

ऑक्टोबर महिन्यात दिवाळी असून त्यावेळचे रेल्वे आरक्षण करण्यासाठी प्रवाशांची आताच लगबग सुरू आहे. रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने प्रवाशांनी सकाळीच तिकीट काढण्यास सुरुवात केली. परंतु, रेल वन अॅप, आयआरसीटीसीचे संकेतस्थळ आणि अॅपमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांना तिकीट काढता आले नाही. इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टूरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी)च्या संकेतस्थळामध्ये रविवारी सकाळी तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांना तिकीट काढणे कठीण झाले. प्रवाशांनी संकेतस्थळ सुरू केल्यावर अनेक त्रुटी येत होत्या. दिवाळीत बाहेरगावी जाण्यासाठी किंवा परतीचा प्रवास करण्यासाठी रेल्वेगाड्यांचे तिकीट काढण्यास सुरुवात झाली आहे. परंतु, रविवारी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान आयआरसीटीसीचे संकेतस्थळ काम करत नव्हते. असाच प्रकार आयआरसीटीसीचे अॅप आणि रेल वन अॅपबाबतही घडत होता. या गोंधळामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागले. सकाळी ८ वाजल्यापासून शेकडो प्रवासी तिकीट काढण्याचा प्रयत्न करत होते. परंतु, हा प्रयत्न अयशस्वी ठरत होता. त्यानंतर सकाळी ८.२५ वाजेपर्यंत संकेतस्थळ बंद होते. त्यानंतर, सकाळी ८.२७ वाजता संकेतस्थळ पूर्ववत झाले. त्यानंतर प्रवाशांना तिकिटे काढता आली.

## गणेशोत्सव की निवडणूक; प्रभाग रचनेच्या प्रारूप आराखड्यावर हरकती सूचनासाठी गणेशोत्सवात भावी उमेदवारांची धावपळ

**■मुंबई। प्रतिनिधी:**

मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणूकीसाठी प्रभागांच्या भौगोलिक सीमांबाबतचा प्रारुप आराखडा नुकताच जाहीर झाला असून त्यावर ४ सप्टेंबर पर्यंत हरकती व सूचना नोंदवता येणार आहेत. मात्र हरकती व सूचना नोंदवण्यासाठीचा काळ हा ऐन गणेशोत्सवात आल्यामुळे इच्छुक उमेदवारांपुढे मोठी अडचण निर्माण झाली आहे. उत्सवात जनसंपर्क वाढवायचा की प्रभागाच्या सीमाबाबतचा अभ्यास करायचा असा प्रश्न उमेदवारांना पडला आहे. तसेच अद्याप राजकीय पक्षांनी उमेदवारांना हिरवा कंदिल दिलेला नसल्यामुळे हरकती व सूचना तरी कशा नोंदवायच्या असाही प्रश्न




या उमेदवारांना पडला आहे. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लवकरच अपेक्षित असून मुंबई महापालिकेने आगामी निवडणूकीसाठी प्रभागांच्या भौगोलिक सीमांबाबतचा प्रारुप आराखडा शुक्रवारी २२ ऑगस्ट रोजी रात्री जाहीर केला. या प्रारुप आराखड्यावर मुंबई महानगरपालिकेने नागरिकांकडून हरकती व सूचना मागवल्या आहेत. हरकती व सूचना सादर करण्यासाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. मुंबई महापालिकेची मुदत मार्च २०२२ ला संपली तेव्हापासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. गेली तीन वर्षे या निवडणूकीच्या घोषणेकडे लक्ष लावून बसलेले इच्छुक उमेदवार प्रभाग पुनर्रचनेच्या सूचनेमुळे गोंधळात सापडले आहेत. प्रभाग पुनर्रचनेचा प्रारुप आराखडा जाहीर झाल्यामुळे एक प्रकारे निवडणूकीचे बिगुल वाजल्यासारखे झाले आहे. मात्र ऐन गणेशोत्सवात हरकती व सूचनांसाठी अवघ्या दहा पंधरा दिवसांची मुदत दिल्यामुळे इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी आहे. मुंबईत २२७ प्रभागांची संख्या कायम ठेवण्यात आली असल्यामुळे २०१७ च्या निवडणूकीच्यावेळी जशी प्रभाग रचना होती त्यात यंदा फारसे बदल झालेले नाहीत. मात्र दिलेल्या सीमारेषा प्रत्यक्षात जागेवर जाऊन तपासून बघणे उमेदवारांना भाग आहे. याबाबत काही माजी नगरसेवकांशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, प्रभागाच्या सीमारेषा आम्हीही पडताळून पाहतो. त्याकरीता विभाग कार्यालयाची मदत घेतो, पोलिसांची मदत घेतो. कार्यकर्त्यांच्या मदतीने प्रत्येक कानाकोपरा घटनास्थळी जाऊन पाहतो.

## पाठीवर सळईने चटके; मतिमंद व्यक्तीचे अपहरण करून दोन वर्षे वेठबिगारी





**■खेड। प्रतिनिधी:**

खेड तालुक्यातील कडूस येथून अडीच वर्षांपूर्वी प्रवीण ऊर्फ नागेश मधुकर टोके (वय ४३) या मतिमंद व्यक्तीचे अपहरण करून त्याला सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील अंदोरी येथे एका व्यक्तीकडे सोडण्यात आले होते. या प्रकरणी बंडू सहादू साळुंके (रा. वडगाव पाटोळे, ता. खेड), सचिन रघुनाथ चव्हाण (रा. कडूस, ता. खेड) आणि दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध खेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ एप्रिल २०२३ ते २० ऑगस्ट २०२५ या कालावधीत प्रवीण टोके याला डांबून ठेवण्यात आले. त्याच्याकडून गुलामाप्रमाणे वागणूक देत वेठबिगारी करवून घेण्यात आली.

यामध्ये गाईचा गोठा साफ करणे, सरपण आणि गवत आणणे, गाईंना पाणी पाजणे अशी कामे जबरदस्तीने करवून घेतली गेली. काम न केल्यास त्याला मारहाण करून पाठीवर, हातावर आणि कानावर गरम सळईने चटके देण्यात आले. प्रवीण यांचा भाऊ प्रदीप मधुकर टोके (रा. गुंजवठा चास, ता. खेड) यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास खेड पोलिस करत आहेत.

## अतिवृष्टीमुळे समुद्र किनाऱ्यावर कचऱ्याचे उधाण



**■मुंबई। प्रतिनिधी:**

गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर कचराच कचरा दिसू लागला आहे. भरती ओहोटीमुळे नदी नाल्यातील सगळा कचरा समुद्र किनाऱ्यावर फेकला जात असून गेल्या आठ दिवसात मुंबई महापालिकेच्या घनकचरा विभागाने तब्बल ९५२ मेट्रीक टन कचरा हटवला आहे. मुंबईकरांनी नाल्यात, गटारात फेकलेला कचरा समुद्राने मुंबईलाच साभार परत केला आहे. मुंबईत गेल्या आठवड्यात १५ ऑगस्टपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे विविध समुद्रकिनाऱ्यांवर मोठ्या प्रमाणावर कचरा जमा झाला होता.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने हा कचरा हटवण्यासाठी स्वच्छता मोहीम हाती घेत मुंबईतील स्वराज्यभूमी (गिरगाव), दादर, माहीम, जुहू, वसोर्वा, मढ-मार्वे आणि गोराई या समुद्रकिनाऱ्यांचा परिसर स्वच्छ केला आहे. दिनांक १५ ते २३ ऑगस्ट या आठ दिवसांच्या काळात एकूण ९५२.५ मेट्रिक टन कचरा हटवण्यात आला आहे. सुमारे ३८० कर्मचाऱ्यांनी एकूण ६ संयंत्रांच्या सहाय्याने चोवीस तास राबून हे सहा समुद्रकिनारे पूर्ववत स्वच्छ, सुंदर केले. मुंबईत दररोज सुमारे सहा हजार मेट्रीक टन कचरा तयार होत असतो. पावसाळ्याच्या काळात कचऱ्याचे प्रमाण जास्त असते. तसेच समुद्र किनाऱ्यावरही भरतीमुळे कचरा किनाऱ्यावर फेकला जात असतो. मुंबईत दि. १९ आणि २० ऑगस्ट रोजी मोठ्या प्रमाणात पाऊस कोसळला. यामुळे समुद्र किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर कचरा साठला होता. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या घनकचरा विभागाने गिरगाव चौपाटी, दादर, माहीम, जुहू, वसोर्वा, मढ-मार्वे आणि गोराई या समुद्रकिनाऱ्यांच्या परिसरात जमा झालेला कचरा संकलित करण्यासाठी विशेष मोहीम राबवली होती. या समुद्रकिनाऱ्यांवरून २३ ऑगस्टपर्यंत एकूण ९५२.५ मेट्रिक टन कचरा हटविण्यात आला.

## गणेशभक्तांसाठी राजकीय पक्षांची मोफत बससेवा



**■मुंबई। प्रतिनिधी:**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गणेशभक्त मतदारांना आकर्षित करण्यासाठी यंदा राजकीय पक्षांनी विशेषतः भाजप आणि शिंदेसेनेने कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी शेकडो बसगाड्यांचे बुकिंग केले आहे. यात एसटी महामंडळाच्या ८४३ आणि इतर खासगी अशा हजारावर बसेस आहेत. भाविकांना कोकणात सोडण्यासाठी भाजप आणि शिंदेसेनेमध्ये जणू रस्सीखेच सुरू आहे. रविवारी रात्री उशिरापर्यंत शिंदेसेनेच्या सर्व ३६४ बसेस कोकणाकडे रवाना झाल्या, तर दोन दिवसांत भाजपकडून ४६२ बसेस सोडण्यात आल्या. सोमवारी १७ बसेस सोडण्यात येतील. पश्चिम उपनगरांतील वांद्रे, विलेपार्ले, अंधेरी, दिंडोशी, मागाठाणे, बोरिवली, प्रभादेवी आदी भागांतून ४४४ बसमूधन २० हजार भाविक रवाना झाले. गणेशभक्तांना पूजेचे साहित्य, पाण्याची बाटली, नाष्टा देण्यात येत होता.

कोणाच्या किती बसेस?

आ. प्रकाश सुर्वे (१००), दिंडोशी विभागप्रमुख वैभव भरडकर (८९), कुणाल सरमळकर (५२, सर्व शिंदेसेना), भाजप आ. संजय उपाध्याय (८०), उद्धवसेनेचे आ. सुनील प्रभू (१०), बाळा नांदगावकर (४८), अंधेरी विभाग अध्यक्ष रोहन सावंत (५, दोघेही मनसे).

## कोणाला सांगितलं तर मारून टाकेन; मुंबईत नराधम शिक्षकाने केला विद्यार्थिनीचा लैंगिक छळ

**■मुंबई। प्रतिनिधी:**

मुंबईतील कांदिवली पूर्व परिसरामधून एक धक्कादायक बातमी समोय आली आहे. गुरु आणि शिष्याच्या नात्याला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. कांदिवली येथे एका शिक्षकाने 15 वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीचा वारंवार लैंगिक छळ केल्याची गंभीर माहिती समोर आली आहे. आरोपी शिक्षकाने पीडित मुलीला दहावीच्या परीक्षेत नापास करण्याची धमकी देत, तिच्यासोबत सतत अश्लील चाळे केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. पीडित मुलगी नापास होण्याच्या भितीने आरोपीचा छळ सहन करत होती अशी माहिती समोर आली आहे. अनेक दिवसांपासून हे सर्व घडत होते, पीडित मुलीच्या आईला संशय आल्यानंतर हा प्रकार उघडकीस




आला आहे. या प्रकरणी समतानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कुलदीप पांडे असं या आरोपी शिक्षकाचं नाव असून या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे, तो कांदिवली पूर्वमधील हनुमान नगर येथील पाल राजेंद्र इंग्लिश हायस्कूलमध्ये गणित विषयाचा शिक्षक म्हणून काम करतो. पोलिसांनी पांडेला अटक केली आहे. त्याला न्यायालयाने आरोपी 4 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपी शिक्षक कुलदीप पांडे हा त्या शाळेत गेल्या 15 ते 20 वर्षांपासून गणित हा विषय शिकवतो. पीडित मुलीचे वय 15 असून ती दहावीच्या वर्गामध्ये शिकते. कुलदीप पांडे वारंवार या मुलीकडे जाऊन तिला स्पर्श करायचा, तुला शिकवलेलं काही समजलं की नाही, असे प्रश्न विचारायचा. समजले नाही तर मला परत विचार, मी तुला सांगेन, असे म्हणून तिच्यासोबत अश्लील चाळे करायचा. पीडित मुलीने या प्रकाराला विरोध करूनही हा प्रकार सुरूच होता.

## पुणे शहरात दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांचा उच्छाद

**■मुंबई। प्रतिनिधी:**

शहरात दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांनी उच्छाद मांडला आहे. बिबवेवाडी, औंध,येरवडा, हडपसर भागात पादचारी महिलांचे दागिने हिसकावल्याची घटना घडली. दुचाकीस्वार चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत पादचारी महिलांकडील तीन लाख ४० हजारांचे दागिने हिसकावून नेले.

बिबवेवाडी-अप्पर इंदिरानगर भागातील व्ही.आय. टी. स्कूलच्या प्रवेशद्वारासमोर रविवारी (२४ ऑगस्ट) सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास पादचारी महिलेच्या गळ्यातील ३० हजारांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. याबाबत एका महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार




महिला या बिबवेवाडीतील महेश सोसायटीत राहायला आहेत. त्या सायंकाळी पावणेपाचच्या सुमरास व्ही. आय. टी. स्कूलच्या प्रवेशद्वारासमोर निघाल्या होत्या. त्या वेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ३० हजारांचे मंगळसूत्र हिसकावून नेले. महिलेने आरडाओरडा केला. चोरटे भरधाव वेगात पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक माने तपास करत आहेत.

औंधमधील गायकवाडनगर भागात शनिवारी (२३ ऑगस्ट ) रात्री नऊच्या सुमारास पादचारी महिलेच्या गळ्यातील एक लाख दहा हजारांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. याबाबत एका महिलेने चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला औंधमधील गायकवाडनगर भागात राहायला आहेत. त्या शनिवारी रात्री गायकवाडनगर परिसरातून निघाल्या होत्या. त्या वेळी दुचाकीस्वरा चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेले. पोलीस उपनिरीक्षक तोटे तपास करत आहेत.

येरवडा भागात एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील एक लाख रुपयांचे मंगळसूत्र दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना घडली. याबाबत ज्येष्ठ महिलेने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला २० ऑगस्ट रोजी येरवडा भागातून निघाल्या होत्या. त्या वेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील एक लाख रुपयांचे मंगळसूत्र हिसकावून नेले. पोलीस हवालदार मोरे तपास करत आहेत.

## सायबर चोरट्यांकडून ३७ लाखांची फसवणूक...




**■पुणे। प्रतिनिधी:**

सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत ज्येष्ठ नागरिकासह तिघांची ३७ लाखांची फसवणूक केली. याबाबत एका महिलेने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फियार्दीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला हडपसर-काळेपडळ परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. घरातून ऑनलाइन पद्धतीने कामाची संधी, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते. समाज माध्यमातील जाहिराती, तसेच चित्रफितींना दर्शक पसंती मिळवून दिल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविण्यात आले होते. सुरुवातीला महिलेला चोरट्यांनी एक काम दिले. ऑनलाइन पद्धतीने महिलेने हे काम पूर्ण केल्यानंतर तिच्या खात्यात परताव्यापोटी काही रक्कम चोरट्यांनी जमा केली. त्यामुळे महिलेचा विश्वास बसला. चोरट्यांनी तिला अशा प्रकारच्या कामात (ऑनलाइन टास्क) पैसे गुंतविल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले. त्यानंतर महिलेने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी १६ लाख ८४ हजार ८०० रुपये गुंतविले. चोरट्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात आले. त्यानंतर चोरट्यांनी महिलेशी संपर्क साधणे बंद केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. सहायक पोलीस निरीक्षक रत्नदीप गायकवाड तपास करत आहेत. नोकरीच्या आमिषाने चोरट्यांनी एकाची १२ लाख ५७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एकाने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार घोरपडी गाव परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला होता. परदेशात नोकरीचे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते. नोकरीच्या आमिषाने चोरट्यांनी तक्रारदाराला ऑनलाइन पद्धतीने पैसे जमा करण्यास सांगितले. तक्रारदाराने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी १२ लाख ५७ हजार रुपये जमा केले. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक निकम तपास करत आहेत.

**हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com**

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com